अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त
शिवाजीनगर-घोलेरोड क्षेकार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. 9W0 13090
दिनांक :- 26/06/19

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
अपिल क्र. अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय,
शिवाजीनगर-घोलेरोड क्षे.कार्यालय/पुणे मनपा/अपिल/३२६८ दिनांक २७/०६/२०१९.

१) अपिलकर्ता श्री युगानंद गुलाबराव साळवे
रा – घर क्र. २, आशानगर को.ऑप हौ.सोसायटी लि.
सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६.

२) जनमाहिती अधिकारी तथा
उप अभियंता
शिवाजीनगर-घोलेरोड क्षे.कार्यालय,
पुणे महानगरपालिका

श्री युगानंद गुलाबराव साळवे अपिलार्थी
विरुध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, शिवाजीनगर-घोलेरोड, पुणे मनपा.

माहितीचा अधिकार २००५ चे कलम १९(१) अन्वये सुनावणी दि. ०६/०७/२०१९

अपिलकर्ता श्री-युगानंद गुलाबराव साळवे यांचा दिनांक ०६/०५/२०१९ रोजीचा झोनिपू कार्यालयाकडील माहिती अधिकारातील अर्ज प्राप्त झाला आहे. अपिलकर्ता श्री युगानंद गुलाबराव साळवे यांनी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, यांचेकडे पुणे शहरातील सर्व्हे क्र. १०२ हिस्सा क्र. १ व २ ब शिवाजीनगर, पुणे ४११०१६ या जमिनीवरील झोनिपू प्रकल्पाची माहिती व वस्तुस्थिती दर्शक माहिती मिळणेबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अर्जान्वये अर्ज सादर केला आहे.

जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, पुणे मनपा यांनी अपिलकर्ता यांस खात्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात येईल असे पत्राने कळविले आहे.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिका-याने उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधिची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ०६/०५/२०१९ | ०५/०६/२०१९ | निरंक | निरंक | |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे :- माहिती अधिकार अर्जात नमूद केलेली माहिती दि.०५/०६/२०१९ पर्यंत मिळणे अपेक्षित होते, परंतु अर्जात नमूद केलेल्या माहितीतील घोषित झोपडपट्टीधारक यांची नावे याबाबतची माहिती मिळाली नाही म्हणून सदरचे अपिल दाखल करण्यात आले असे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| २१/०७/२०१९ | २७/०६/२०१९ | होय | निरंक | २९/०६/२०१९ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. ०६/०७/२०१९ वेळ सकाळी १२.०० वाजता

सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिलेल्या माहितीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिका-याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | पुणे शहरातील सर्व्हे क्र. १०२ हिस्सा क्र. १ व २ ब शिवाजीनगर, पुणे ४११०१६ या जमिनीवरील झोनिपू प्रकल्पाची माहिती व वस्तुस्थिती दर्शक माहिती मिळणेबाबत. | जनमाहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांस खात्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात येईल. |

सदरची माहिती अपिलकर्ता यांस उपलब्ध झाली नसल्याने पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## -आदेश-

प्रस्तुत प्रकरणी सदरचे अपिल अंशत: मान्य करण्यात येते, अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागविलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी १५ दिवसात नि: शुल्क उपलब्ध करून देणे बाबतचे आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त सुनावणीमध्ये वरीलप्रमाणे निर्णय देण्यात आलेला असून सदर अपिल निकालात काढण्यात येत आहे.

टिप :- १) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसांच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नविन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे ४११००१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

(किशोरी शिंदे)
अपिल प्राधिकारी *तथा*
महापालिका सहाय्यक आयुक्त
शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका